.nagpur

# NMC e NEWS LETTER

जानेवारी २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## स्वच्छता ॲप जनजागृती अभियान

नागपूर : स्वच्छ सर्वेक्षण २०१८ बद्दल नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने नागपूर महानगरपालिका, मनपाद्वारा नियुक्त स्वच्छता म्बेसिडर आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशन यांनी रविवारी (ता. ७ जानेवारी) जनजागृती अभियान राबविला. या अभियानात प्रामुख्याने मनपा आयुक्त अश्विन मुदगल, उपायुक्त जयंत दांडेगावकर यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या हे विशेष. य़ावेळी सुमारे २५० पेक्षा अधिक नागरिकांनी ॲप डाऊनलोड केले. स्वतः आयुक्तांनी स्वच्छते संदर्भातील समस्या जाणून घेतल्या,

## थोडक्यात

### ४ फेब्रुवारीपासून महिला उद्योजिका मेळावा

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभाग व महिला व बाल कल्याण समितीद्वारे घेण्यात येणारा महिला उद्योजिका मेळावा ४ ते ११ फेब्रुवारी दरम्यान रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती वर्षा ठाकरे यांनी दिली. सोमवार (ता.८) मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या समितीच्या आढावा बैठकीप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी उपसभापती श्रद्धा पाठक, सदस्या दिव्या धुरडे, वंदना भगत, साक्षी राऊत, श्रीमती जिशान मुमताज मो.इरफान अंसारी, वैशाली नारनवरे, उपायुक्त रंजना लाडे प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना ठाकरे म्हणाल्या, महिला उद्योजिका मेळावा वैदर्भीय स्तरावर घेण्याचा विचार करण्यात आलेला आहे. विदर्भातील महिला बचत गट यामध्ये सहभागी होतील. तसेच विदर्भातील अनेक बचत गट भेट देण्यासाठी येणार आहे. महिला उद्योजिका मेळाव्यात सामजिक, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्याचा समितीचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

### मोरभवन स्थानकावर महिला प्रसाधनगृहाची निर्मिती करा : बंटी कुकडे



नागपूर : मोरभवन येथे दररोज ५० हजारांवर प्रवासी आणि १२५ पेक्षा अधिक ‘आपली बस’च्या फेऱ्या होत असतात. या स्थानकावर मुलभूत सुविधा नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत म्हणून प्राधान्याने महिलांसाठी प्रसाधनगृह, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि प्रवासी निवारा आदी सोयी सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात असे निर्देश परिवहन समिती सभापतींनी दिले.शहराच्या ह्दयस्थानी असलेल्या मोरभवन बस स्थानकावर मुलभूत सुविधा नाही. महिलांसाठी शौचालय नाही, शुद्ध पिण्याचे पाणी नाही, अशा अनेक तक्रारी परिवहन विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. याची दखल घेत स्वतः परिवहन सभापतींनी मोरभवन येथील प्रत्यक्ष पाहणी करुन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थिनी आदींशी चर्चा केली. यावेळी काही विद्यार्थ्यांनी सकाळी मार्गावर गर्दी होत असल्याने बस फेऱ्यावाढविण्याची मागणी केली. तर काही प्रवाशांनी त्यांच्या परिसरात बस थांबा देण्याची मागणी केली.

### ‘एक शाम शहीदों के नाम’ मुशायरा व कवी संमेलन

नागपूर : नागपूर महानगरपालिकेतर्फे महाल येथे आयोजित ‘एक शाम शहीदों के नाम’ या शीर्षकांतर्गत झालेल्या मुशायरा आणि कवी संमेलनाला श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजे वीरेंद्र शाह होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्थायी समितीचे सभापती संदीप जाधव, गांधीबाग झोन सभापती सुमेधा देशपांडे, माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, नगरसेविका नेहा वाघमारे, राजेश मुधोजी भोसले, ज्येष्ठ समाजसेवक उमेश चौबे, भाजपा मध्य नागपूरचे अध्यक्ष बंडू राऊत, गांधीबाग झोनचे सहायक आयुक्त अशोक पाटील, अधिकारी संजय चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजक रज्जाक कुरेश यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात उर्दू साहित्यातील विख्यात शायर अब्दुल वाहीद अंसारी द्वारा ‘नात-ए-पाक’ या रचनेच्या सादरीकरणाने झाले. मंजर भोपाली, मिशम गोपालपुरी, परवाज इलाहबादी, अलताफ जिया, वाहीद अंसारी, कवयित्री मधु गुप्ता, शायर वारिस वारसी, जमील साहिर, कमर एजाज, इश्तेयाक कामिल, इरशाद अंजुम, डॉ. खालिद नैयर, इमरान फैज, जमील असमद जमील मुशायरा आणि कविसंमेलनात सहभागी झाले होते.

# खूशखबर ! उपराजधानी झाली हागणदारीमुक्त



राज्य सरकारच्या पथकाने जुलै २०१७ मध्ये नागपूर शहराला हागणदारीमुक्त घोषित केले होते. त्यानंतर महापालिकेतर्फे शहरातील ८० ठिकाणे हागणदारीमुक्त झाल्याची घोषणा केली होती. याची माहिती केंद्र सरकारला देऊन पथकामार्फत नागपूर शहराचा दौरा करण्याची विनंती केली होती. त्यानुसार २८ ते ३० डिसेंबर दरम्यान केंद्र सरकारच्या एक सदस्यीय पथकाने शहरातील १०० हून अधिक भागाचा दौरा करून पाहणी केली. दौऱ्यानंतर अवघ्या तीन दिवसात नागपूर शहराला हागणदारीमुक्त घोषित केल्याने महापालिका प्रशासन व सत्तापक्षात आनंदाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे दोन दिवसानंतर होणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणातही याचा फायदा मिळणार आहे. हागणदारीमुक्त शहराला ३५० गुण मिळतात. त्यामुळे शहराला या वर्गात शंभर टक्के गुण मिळणार आहे. आयुक्त अश्विन मुदगल यांनी आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी शहराला हागणदारीमुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यांनी स्वतः शहरातील विविध भागांना भेटी देऊन नागरिकांसोबत चर्चा केली होती. लोकांमध्ये जाऊन त्यांनी सार्वजनिक व व्यक्तिगत शौचालय बांधण्याचे आवाहन केले. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनाही यासंदर्भात निर्देश दिले. आरोग्य विभागाच्या पथकाला सक्रिय केले. आठ महिन्यात शहरातील संबंधित ठिकाणे निश्चित केली. सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले. यामुळे नागपूर शहर हागणदारीमुक्त झाले.

### शहरातील जनतेचे सहकार्यासाठी आभार : आयुक्त अश्विन मुदगल

हागणदारीमुक्त शहरात नागपूरचा समावेश झाला आहे, ही आनंदाची बाब आहे. यासाठी शहरातील नागरिकांनी केलेल्या सहकार्याबाबत त्यांचे आभार व्यक्त करतो. एका व्यक्तीच्या प्रयत्नामुळे हे यश मिळणे शक्य नव्हते. स्वच्छता सर्वेक्षणात याचा फायदा होणार आहे. यामुळे ३५० गुण मिळतील. शहरातील नागरिक स्वच्छतेविषयी जागरूक आहेत. केंद्रीय पथक नागपूर दौऱ्यावर येणार असल्याबाबत ऑनलाईऩ माहिती मिळाली होती. या पथकाने १०० हून अधिक ठिकणांची पाहणी केली. १७०० जियोटेक फोटो काढले. नागरिकांसोबतचे चर्चा करतानाचे व्हिडीओ अपलोड केले.



## सावित्रीबाई फुले जयंती निमित्त शिक्षिकांचा सत्कार

नागपूर : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त मनपा महिला व बालकल्याण समितीतर्फे वाल्मिकीनगर हिंदी माध्यमिक शाळा, गांधीनगर येथे मनपा शाळेतील उत्कृष्ट दहा शिक्षिकांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी मनपा शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार होत्या. प्रामुख्याने मनपाच्या महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, सदस्या दिव्या धुरडे, वंदना भगत, श्रद्धा पाठक, साक्षी राऊत, वैशाली नारनवरे आदींची उपस्थिती होती. यांच्यासह वंदना शर्मा, संगीता अग्रवाल, श्वेता निगम, मीरा कुल्लर, निर्धारच्या कांता ढेपे, सुनंदा सोनवले, जया पानतावणे यांची उपस्थीती होती. कार्यक्रमात मनपाच्या दहा झोनमधील प्रत्येकी एका शिक्षिकेचा सत्कार कऱण्यात आला. वाल्मिकीनगर हिंदी माध्यमिक शाळेतील विद्यार्थीनींना शालेय साहित्याचे वितरण कऱण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वर्षा ठाकरे यांनी केले. संचालन श्रीमती घिमे यांनी तर आभार श्रीमती परिहार यांनी मानले. सत्कार करण्यात आलेल्या शिक्षिकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक शाळेच्या वंदना दांडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक शाळेच्या सुरेखा सावरबांधे, संजयनगर माध्यमिक शाळेच्या ज्योती काकडे, कपीलनगर माध्यमिक शाळेच्या पंचलता नागदिवे, हाजी अब्दुललीडर शाळेच्या रुख्मा कौसर, एम.के.आझाद माध्यमिक शाळेच्या शाहीन अख्तर, वाल्मिकी नगर हिंदी माध्यमिक शाळेच्या रंजनी परिघर, नेताजी मार्केट प्राथमिक शाळेच्या शारदा मिश्रा, एकात्मता प्राथमिक शाळेच्या रोशनी जंजाल, जी.एम. बनायितवाला शाळेच्या रजिया शाहीन, मनपा शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार यांचा समावेश होता. त्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि तुळशीचे रोपटे देऊन देऊन सत्कार कऱण्यात आला.

## वुशू स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर पदक विजेत्यांचा सत्कार

नागपूर : स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियातर्फे अनुक्रमे जम्मू आणि गुवाहाटी येथे आयोजित ६३ व्या राष्ट्रीय शालेय स्पर्धेअंतर्गत झालेल्या १७ वर्षाखालील मुलांच्या आणि १९ वर्षाखालील मुलींच्या वुशू स्पर्धेत अनुक्रमे प्रथम आणि तृतीय विजेतेपद पटकाविणाऱ्या नागपुरातील दोन खेळाडूंचा महापौर नंदा जिचकार आणि क्रीडा सभापती नागेश सहारे यांच्या हस्ते मनपा मुख्यालयात सत्कार करण्यात आला.१७ वर्षाखालील ८५ किलो वजनगटात मुंडले पब्लिक स्कूल गवसी मानापूरचा नवव्या वर्गातील विद्यार्थी यश जयेश कांबळे याने जम्मू येथे झालेल्या स्पर्धेत विजेतेपद मिळवित सुवर्णपदक प्राप्त केले. उपांत्यपूर्व फेरीत त्याने मध्यप्रदेशच्या खेळाडूचा, उपांत्य फेरीत पंजाबच्या खेळाडूचा तर अंतिम सामन्यात सीबीएससीच्या खेळाडूवर मात करीत विजय मिळविला. या स्पर्धेत १५ राज्यांचा सहभाग होता. १९ वर्षाखालील ३६ किलो वजनगटात विदर्भ बुनियादी कनिष्ठ महाविद्यालयाची १२ वीची विद्यार्थिनी आचल सूरचंद भोयर हिने तृतीय स्थान मिळवित कांस्य पदक पटकाविले. या स्पर्धेत १३ राज्यांचा सहभाग होता. दोन्ही खेळाडूंनी मिळविलेल्या या यशाबद्दल महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते महापौर कक्षात त्यांचा सत्कार करण्यात आला. क्रीडा सभापती नागेश सहारे यांनीही त्यांचा सत्कार करीत भविष्यातील वाटचाली बद्दल शुभेच्छा दिल्या. सत्कारप्रसंगी मनपाच्या क्रीडा समितीचे उप सभापती प्रमोद तभाने, क्रीडा अधिकारी महेश पडोळे, प्रशिक्षक प्रफुल्ल गजभिये, मुंडले पब्लिक स्कूलचे क्रीडा शिक्षक अरुण भांदककर, विदर्भ बुनियादी कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक पी.डी. रंगारी उपस्थित होते.



# मनपामध्ये चार स्वातंत्र्य संग्रामातील योद्ध्यांच्या तैलचित्रांचे अनावरण

नागपूर : भारतीय स्वातंत्र्यलढ्यात जीवाची बाजी लावून इंग्रजांविरुद्ध लढणाऱ्या चार योद्ध्यांच्या तैलचित्राचे अनावरण नागपूर महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीच्या दालनात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते करण्यात आले. देशासाठी बलिदान देणारे क्रांतिवीर मदनलाल धिंग्रा, विष्णू गणेश पिंगळे, राजगुरू आणि नेताजी सुभाषचंद्र बोस या चार महापुरुषांच्या तैलचित्राचा यात समावेश आहे. यावेळी महापौर नंदा जिचकार यांच्यासह नगरसेवक सुनील अग्रवाल अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे, अतिरिक्त आयुक्त डॉ. आर. झेड. सिद्दीकी, उपायुक्त रवींद्र देवतळे, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, अतिरिक्त उपायुक्त राजेश मोहिते, मुख्य अभियंता विजय बनगीरवार, कार्यकारी अभियंता नरेश बोरकर, मनोज तालेवार, हत्तीरोग अधिकारी जयश्री थोटे, सहायक आयुक्त सुभाष जयदेव, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर आदी उपस्थित होते.

# नागपुरात सुरू होणार मनपाचे सात केंद्रीय विद्यालय

### त्रिसदस्यीय समितीला ना. प्रकाश जावडेकरांनी दिले आश्वासन

नागपूर : नागपूर महानगरपालिका आणि केंद्र सरकार संचालित सात केंद्रीय विद्यालय नागपुरात सुरू होणार आहेत. मनपाच्या त्रीसदस्यीय समितीने केंद्रीय मानव संसाधन व मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी केंद्रीय विद्यालय सुरू करण्यासंदर्भात आश्वासन दिले.नागपूर महानगरपालिका शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, शिक्षण समितीचे सदस्य तथा नगरसेवक पिंटू झलके, राजेंद्र सोनकुसरे यांचा या त्रीसदस्यीय समितीत समावेश होता. समिती सदस्यांनी २ जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन सदर प्रस्तावासंदर्भात चर्चा केली. ना. गडकरी यांनी तातडीने यासंदर्भात ना. प्रकाश जावडेकर यांच्याशी चर्चा केली. यानंतर मनपाच्या त्रीसदस्यीय समितीने संसद भवनात ना. प्रकाश जावडेकर यांची भेट घेऊन नागपुरात सात केंद्रीय विद्यालय सुरू करण्यासंदर्भात चर्चा केली. यासंदर्भातील निवेदनही त्यांनी दिले. त्यावर त्यांनी येत्या शैक्षणिक सत्रापासून केंद्रीय विद्यालय सुरु करण्याचे आश्वासन समितीला दिल्याची माहिती शिक्षण सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी दिली.

## थोडक्यात...

### सुदामनगरी ते मोरभवन बससेवेचा शुभारंभ

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाअंतर्गत सुदामनगरी ते मोरभवन बससेवेचा शुभारंभ गुरूवारी (ता.१८ जानेवारी) सुदामनगरी स्थानकावरून करण्यात आला. नगरसेवक पिंटू झलके, नगरसेविका स्वाती आखतकर, विद्या मडावी यांनी यावेळी नव्याने सुरू झालेल्या बसला हिरवी झेंडी दाखविली. यावेळी अजय बढारे, लिलाताई हाथीबेड, शुभांगी गायधने, नरेंद्र नांदूरकर, पुष्पा पांडे, भोलाभाऊ कुरडकर, योगेश मडावी, चंद्रकात आखतकर, योगेश मडावी, अजय हाथीबेड, परिवहन विभागाचे रामराव मातकर, सिद्धार्थ गजभिये प्रामुख्याने उपस्थित होते. ही बस सुदामनगरी मार्गे टेलिफोन नगर, पंचवटी, सक्करदरा चौक, मेडिकल चौक, मोक्षधाम चौक, मानस चौक, महाराजबाग चौक या मार्गे धावेल. या बसचे प्रवास भाडे पूर्ण तिकीट १९ रूपये तर अर्धे तिकीट १० रुपये असे राहील, अशी माहिती परिवहन विभागाद्वारे देण्यात आली आहे.



### स्वच्छता ॲम्बेसिडर्सचा गणराज्यदिनी सत्कार



नागपूर : स्वच्छ सर्वेक्षणासंदर्भात जनजागृती करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने नेमलेल्या स्वच्छता ॲम्बेसेडरचा आणि स्वच्छ सर्वेक्षण २०१८ अंतर्गत झोननिहाय विविध गटात प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्यांचा सत्कार गणराज्य दिनानिमित्त मनपा मुख्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आला.स्वच्छता ॲम्बेसेडर डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. अमित समर्थ, कवी मधुप पांडेय, पर्यावरण क्षेत्रात कार्य करणारे कौस्तभ चॅटजी आणि आरजे निकेता साने हे आपआपल्या क्षेत्रात स्वच्छताविषयक जनजागृती करीत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि तुळशीचे रोपटे देऊन महापौर नंदा जिचकार यांनी केला. स्वच्छ सर्वेक्षण २०१८ अंतर्गत विविध गटातील झोननिहाय व्यक्ती, संस्थांनी स्वच्छतेसंदर्भात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. हॉटेल्स गटात झोन क्र. १ ते १० अंतर्गत अनुक्रमे हॉटेल एअरपोर्ट सेंटरपॉईंट, हॉटेल हेरिटेज, आर. आर. बार ॲण्ड रेस्टॉरंट, हॉटेल द्वारकामाई, युफोरिया रेस्टॉरंट, हॉटेल अल–झम–झम, डे टू डे रेस्टॉरंट, काश्मीर रेस्टारंट, अशोका रेस्टॉरंट, शाळा गटात सोमलवार हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, सी.पी. ॲण्ड बेरार हायस्कूल, साऊथ प्वॉईंट स्कूल, नारायण विद्यालयम, स्वराज पब्लिक स्कूल, जे.एन. टाटा पारसी गर्ल्स हायस्कूल, झुलेका कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, श्रेयस विद्यालय, एसएससी गर्ल्स हायस्कूल, पेन्शन नगर उर्दू शाळा, रुग्णालये गटात ऑरेंज सिटी हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर, आयकॉन हॉस्पीटल, आदीशक्ती हॉस्पीटल, पूर्वी हॉस्पीटल, वंजारी हॉस्पीटल, न्यू ईरा हॉस्पीटल, खिदमत हॉस्पीटल, श्री रामदेवबाबा रुखमिणीदेवी मेमोरियल मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल आणि रिसर्च सेंटर, हर्षल मॅटरनिटी होम, लेक्सीस मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल प्रा.लि., गृहनिर्माण संस्था गटात अमल एन्कल्युसीव, म्हाडा कॉलनी, आनंद मेलिनियम टॉवर, टाटा कॅपिटल हाईटस, एन.आय,टी. कॉम्प्लेक्स, भोसले विहार कॉलनी, मेहंदीबाग कॉलनी, व्यंकटेश कॉलनी, निलगिरी अपार्टमेंट, कुकरेजा नगर तर व्यापारी संघटना गटात गोकुलपेठ व्यापारी संघटना, नॅशनल गांधी मार्केट असोशिएशन, महात्मा फुले मार्केट, गांधी गेट व्यापारी सेवा मंडल, दि नागपूर जनरल मर्चंट असोशिएशन, कमाल बाजार, जरीपटका दुकानदार संघ यांच्या प्रतिनिधींचा महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, तुळशीचे रोपटे देऊन सत्कार करण्यात आला.

# खर्चात कपात करा आणि उत्पन्न वाढवा

## ना. नितीन गडकरी यांचे मनपाला निर्देश : आर्थिक स्थितीचा घेतला आढावा



नागपूर : नागपूर महानगरपालिका नागरिकांना दर्जेदार सुविधा देत असते. त्यावर परिणाम पडू नये यासाठी मनपाची आर्थिक स्थिती चांगली राहायला हवी. यासाठी विविध खर्चात कपात करण्यात यावी आणि नवनवे उत्पन्नाचे स्त्रोत शोधून उत्पन्न वाढविण्यात यावे. पदाधिकारी आणि अधिकारी यांनी संयुक्त प्रयत्न करून प्रगतीपथावर असलेले सर्व प्रकल्पतातडीने पूर्ण करावे, असे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मनपा मुख्यालयात आयोजित बैठकीत उपस्थितांना दिले.नागपूर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते.बैठकीला राज्याचे ऊर्जामंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, आ.सुधाकर कोहळे, आ. कृष्णा खोपडे, आ. डॉ. मिलिंद माने, आ. विकास कुंभारे, आ. मल्लिकार्जुन रेड्डी, आ. नागो गाणार, जिल्हाधिकारी सचिन कुर्वे, मनपा आयुक्त अश्विन मुदगल,नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती डॉ. दीपक म्हैसकर, माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, दिव्या धुरडे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र कुंभारे,उपायुक्त रवींद्र देवतळे, उपायुक्त राजेश मोहिते, मुख्य अभियंता विजय बनगीरवार, नगररचना सहायक संचालक गावंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मोना ठाकूर उपस्थित होते. आयुक्त अश्विन मुदगल यांनी मनपाच्या आर्थिक स्थितीचा अहवाल सादर केला. उत्पन्नाचे नवे स्त्रोत काय, याविषयीही सादरीकरण्याच्या माध्यमातून माहिती दिली.

### कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटरला भेट

बैठकीनंतर ना. नितीन गडकरी यांनी मनपाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत नागपूर सेफ ण्ड स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत तयार करण्यात आलेल्या कमांड ण्ड कंट्रोल सेंटरला भेट दिली. या सेंटरच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती त्यांनी जाणून घेतली.

## वर्धिनी वस्तू विक्री केंद्राचे ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन

नागपूर : राज्यभरातील ग्रामीण व शहरी भागातील स्वयंसहायता बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उदात्त हेतूने नागपूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीने पुढाकार घेतला आहे. उत्पादनांच्या विक्रीसाठी मधुमाधव टॉवर, गोकुळपेठ येथे वर्धिनी वस्तू विक्री केंद्राला सोमवार १५ जानेवारीपासून सुरुवात झाली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या आगळ्यावेगळ्या वर्धिनी वस्तू विक्री केंद्राचे उद्धाटन करण्यात आले. यावेळी आ. प्रा. अनिल सोले, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती वर्षा ठाकरे, स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीचे सभापती संजय बंगाले, धरमपेठ झोन सभापती रूपा रॉय, महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य वंदना भगत,नगरसेविका दिव्या धुरडे, नगरसेवक सुनील हिरणवार, निशांत गांधी, मनपाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. रिजवान सिद्दीकी, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय उपजीविका अभियानाचे नॅशनल मिशन मॅनेजर मयंकमोहन मिश्रा, जयंत पाठक, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे उपस्थित होते. नागपूर महानगरपालिका अंतर्गत महिला व बालकल्याण समिती समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने संचालित ‘उमेद डॉट कॉम’ वर्धिनी वस्तू विक्री केंद्राचे उद्धाटन ना. नितीन गडकरी यांनी फीत कापून व दीप प्रज्वलन करून केले. त्यानंतर ना. गडकरी यांनी वस्तू विक्री केंद्राची पाहणी करून महिला बचत गटाच्या सदस्यांकडून माहिती घेतली. ना. नितीन गडकरी यांनी ही संकल्पना राबविणाऱ्या सर्व विभागाच्या पदाधिकाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे आणि महिला बचत गट सदस्यांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या. पर्यावरणपूरक ‘वर्धिनी वस्तू विक्री केंद्र’ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आलेल्या वर्धिनी वस्तू विक्री केंद्र पर्यावरणपूरक आहे. या विक्री केंद्रात प्लास्टिकचा उपयोग केल्या जात नाही. प्लास्टिक डिस्पोजल साहित्याला पर्याय म्हणून सुपारीच्या सालापासून बनविण्यात आलेल्या प्लेटस्सुद्धा येथे विक्रीस उपलब्ध आहेत. खादी बॅग, टेराकोटा ज्वेलरी, इंडियन पास्ता अर्थात सरगुंडे, वायगावची हळद, घरगुती मसाले, बांबूपासून तयार करण्यात आलेल्या नित्यपयोगी वस्तू, कागदी बुके, हॅण्डमेड शर्ट आदी वस्तू येथे विक्रीस आहेत. वर्धा, गोंदिया, गडचिरोली, रत्नागिरी, सोलापूर, यवतमाळ, नागपूर आदी शहरातील बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांचा समावेश विक्री केंद्रात आहे.



## ७३ आणि ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे स्थानिक स्वराज संस्थेला बळकटी : महापौर नंदा जिचकार

### ६९ वा प्रजासत्ताक दिन मनपात उत्साहात साजरा



नागपूर : स्थानिक स्वराज्य संस्थेला स्वायत्त दर्जा ७३ आणि ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे मिळाला, यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थेला बळकटी मिळाली, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले. ६९ व्या प्रजासत्ताक दिनी पार पडलेल्या मनपा मुख्यालयातील कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती संदीप जाधव, विरोधी पक्ष नेता तानाजी वनवे, आयुक्त अश्विन मुदगल, धरमपेठ झोन सभापती रूपा राय, नगरसेवक प्रमोद कौरती, जितेंद्र घोडेस्वार, स्वच्छता म्बेसेडर डॉ. चंद्रशेखर मेश्राम, कवी मधुप पांडेय, डॉ. अमित समर्थ, कौस्तभ चॅटर्जी, आरजे निकेता साने प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना मुख्य भाषणात महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, ४ एप्रिल १९९३ या दिवासापासून ७३ व ७४ वी घटना दुरूस्ती अंमलात आली. यामुळे सर्व राज्यात गावपातळी, जिल्हापातळी आणि या दोन्हीमधील तालुका विकास गट पातळी अशी त्रिरिस्तरीय पंचायत राज्यपद्धती सुरू झाली. स्थानिक स्वराज्य संस्थाना आपल्या क्षेत्रात सामाजिक न्याय आणि आर्थिक अधिकार या घटना दुरूस्तीने दिले. देशाच्या शासन व्यवस्थेमध्ये हा महत्त्वाचा टप्पा असून त्यामळे स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. गावाच्या विकासाची दिशा व विचार केंद्र सरकारातील तसेच राज्य सरकारातील राज्यकर्त्यांपेक्षा गावातील स्थानिक गावकरी,स्त्री पुरूष अधिक चांगल्या पद्धतीने करू शकतात यावर या कायद्याने शिक्कामोर्तब केल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर अग्निशमन दलाच्या परेडचे महापौर व आयुक्त यांनी निरिक्षण केले व मानवंदना स्वीकारली. यावेळी महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या स्वच्छता अँम्बेसेडरचा महापौर नंदा जिचकार यांनी शाल, श्रीफळ, तुळशीचे रोपटे देऊन सत्कार केला. स्वच्छ सर्वेक्षण २०१८ अंतर्गत झोन निहाय विविध गटात प्रथम क्रमांक प्राप्तांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे, तर आभारप्रदर्शन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले. कार्यक्रमाला मनपातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय महिला कुस्ती स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्याला सर्वसाधारण विजेतेपद

## वरिष्ठ गटात ठाणे शहर तर सबज्युनिअर गटात पुणे जिल्हा उपविजेता



नागपूर : नागपूर महानगरपालिका, महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद आणि नागपूर जिल्हा कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने चिटणीस पार्क येथे आयोजित २० व्या सिनिअर आणि दुस–या सबज्युनिअर राज्यस्तरीय महिला कुस्ती स्पर्धेच्या सर्वसाधारण विजेतेपदाची माळ कोल्हापूर जिल्ह्याच्या गळ्यात पडली. वरिष्ठ महिला गटात ठाणे शहर तर सबज्युनिअर गटात पुणे जिल्ह्याने उपविजेते पद पटकाविले.कोल्हापूर जिल्ह्याच्या वरिष्ठ महिला कुस्तीपटूंनी २ सुवर्ण, १ रौप्य, २ कास्य तर उपविजेता ठाणे शहराच्य कुस्तीपटूंनी २ सुवर्ण, १ रौप्य, ३ कास्यपदकांची कमाई केली. सबज्युनिअर गटात कोल्हापूरच्या कुस्तीपटूंनी ६ सुवर्ण, १ रौप्य, ३ कास्य तर उपविजेता पुणे जिल्ह्याने १ सुवर्ण, ३ रौप्य, १ कास्य पदक पटकाविले. २० आणि २१ जानेवारी रोजी आयोजित कुस्ती स्पर्धेचा समारोप महापौर नंदा जिचकार आणि मनपाचे क्रीडा सभापती नागेश सहारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी मंचावर महाराष्ट्र कुस्तीगीर उपाध्यक्ष तथा आयोजन समितीचे सचिव गणेश कोहळे, महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे कार्याध्यक्ष नामदेव मोहिते, सरचिटणीस बाळासाहेब लांडगे, आंतरराष्ट्रीय पंच दिलीप महाजन, कुस्तीगीर परिषदेचे विभागीय सचिव संजय तीरथकर, नागपूर जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव अनिल आदमने, मनपाचे क्रीडा निरिक्षक नरेश चौधरी, क्रीडा विभाग प्रमुख नरेश सवाईथूल उपस्थित होते. यावेळी महापौर नंदा जिचकार यांच्याहस्ते सर्व विजेत्यांना पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, नागपुरात राज्यस्तरीय महिला कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्याचा मान आम्हाला मिळाला याबद्दल महिला महापौर म्हणून मला अभिमान आहे. अशा प्रकारचे आयोजन यापुढेही करण्याची संधी मिळाल्यास आम्ही आमचे भाग्य समजू असे म्हणत त्यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी आयोजन समितीच्यावतीने सर्वांचे आभार मानले.